# शहराला २० वर्षांसाठी खाजगीकरणातून पाणीपुरवठा

## मनपाचा निर्णय : १ जानेवारीपासून अंमलबजावणी ▮ आज नागरिकांसाठी कार्यशाळा

**औरंगाबाद** | दि. २९ (लोकमत ब्युरो)

**महापालिका** १ जानेवारी २०१३ पासून पुढील २० वर्षांसाठी सुभाष प्रोजेक्ट मार्केटिंग लि. या कंपनीने नेमलेल्या औरंगाबाद वॉटर युटिलिटी कंपनीकडे (एडब्ल्यूयूसी) शहरातील पाणीपुरवठा योजना हस्तांतरित करीत आहे. त्या पार्श्वभूमीवर आयुक्त डॉ. पुरुषोत्तम भापकर यांनी आज रात्री कंपनी व मनपा अधिकाऱ्यांची बैठक घेतली.

शहरातील पाणीपुरवठा संचलन, देखभाल, दुरुस्ती व समांतर जलवाहिनी टाकण्याचे काम एडब्ल्यूयूसीमार्फत होणार आहे. उद्या ३० रोजी नागरिकांसाठी दोन ठिकाणी योजनेची माहिती देण्यासाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आल्याचे कार्यकारी अभियंता एस.डी. पानझडे यांनी कळविले आहे.

समांतर जलवाहिनीची माहिती, कामाचे नियोजन, नागरिकांना देण्यात येणाऱ्या सुविधा, भविष्यात पाणीपुरवठ्याबाबत कंपनीकडून मिळणारे स्तर याची माहिती देण्यासाठी उद्या ३० रोजी संत एकनाथ रंगमंदिर येथे सकाळी १० ते १२ वाजेपर्यंत आणि संत तुकाराम नाट्यगृह, सिडको येथे दु. ३ ते ५ या वेळेत नागरिकांसाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

औरंगाबादकरांना नववर्षाचा पहिलाच दिवस म्हणजे १ जानेवारी २०१३ हा खाजगीकरणातून सेवा देणारा ठरणार आहे. पाणीपुरवठा, पाणीपट्टी वसुलीची जबाबदारी समांतर जलवाहिनीची कंत्राटदार कंपनी एडब्ल्यूयूसीकडे देण्यात येईल. शहरातील १ लाख ६ हजार नळ कनेक्शन कंत्राटदार कंपनीकडे सोपविण्यात येणार आहेत. एडब्ल्यूयूसीचे मुख्य अभियंता श्रीरंग देशपांडे म्हणाले की, आमची तयारी पूर्ण झाली आहे.

नागरिकांना सुविधा देण्यासाठी, त्यांच्या तक्रारी सोडविण्यासाठी कंपनीचा प्रयत्न राहील. कंपनी माहिती तंत्रज्ञानाचा वापर करणार आहे. जलवाहिनीच्या गळत्या व नागरिकांच्या तक्रारींसाठी मोबाईल व्हॅन पथक, १६ कर्मचाऱ्यांच्या पाच टीम कायम सेवेत राहतील.

उद्या ३० रोजी पॉवर पॉइंट प्रेझेंटेशनद्वारे एडब्ल्यूयूसी नायकवाडी जल उपसा केंद्र ते शहरातील अंतर्गत जल वितरणाच्या केलेल्या अभ्यासाची माहिती देणार आहे. शहरातील कोणत्या प्रभागात कमी पाणीपुरवठा होतो, कोणत्या प्रभागात जास्तीचा पाणीपुरवठा होतो, वेळापत्रक कसे आहे यासह तांत्रिक अडचणी, पाणीपट्टीबाबत नागरिकांच्या मनातील शंका, कंपनीच्या सेवा याबाबत कार्यशाळेत चर्चा व शंका निरसन होईल. एडब्ल्यूयूसीचे १५२ कर्मचारी सध्या शहरात काम करीत आहेत. त्यांच्यासोबत मनपाचे ३२५ लाईनमन देण्यात येणार आहेत. ४७७ कर्मचारी एडब्ल्यूयूसीकडे काम करणार आहेत. त्यांचे वेतन ती कंपनीच करणार आहे.